सकाळ
पुणे, शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

# नृत्यातून रविवारी उलगडणार संतांचे जीवन

**पुणे :** संतांच्या अभंगांच्या माध्यमातून वारकरी सांप्रदायाचा प्रवास रंगमंचावर साकार करणारा 'माउली-एक कालातीत परंपरा' हा नृत्य कार्यक्रम रविवारी (ता. १२) सायंकाळी पाच वाजता कोथरूड येथील एमईएस सभागृहात होईल. या वेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम कलाकार बाला देवी चंद्रशेखर या संतांचे जीवन व त्यांचे अभंग भरतनाट्यम नृत्याच्या माध्यमातून साकारणार आहेत. फ्युएल शिक्षण संस्थेतर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या माध्यमातून मोफत शिक्षण घेणाऱ्या संस्थेतील दहा मुलींच्या शिक्षणाला साह्य करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेच्या प्रा. डॉ. प्राची अहिरराव आणि चंद्रशेखर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.